पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक: नस/४/कावि/ ४४४/२०१३
दिनांक : ०९/०५/२०१३

प्रति,

मा. ..................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/०५/२०१३ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे २०१३ ची मासिक मा.महापालिका सभा सोमवार दिनांक २०/०५/२०१३ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.</u>**

**सूचना**

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये )

**<u>कार्यपत्रिका क्रमांक १७</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे २०१३ ची मासिक मा.महापालिका सभा सोमवार दिनांक २०/०५/२०१३ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

---------------

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

(मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ४४ अन्वये)

---------------

**<u>मा.स्थायी समितीचे ठराव</u>**

**विषय क्रमांक १)** संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/२८/२०१३ दि.८/१/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १५/०१/२०१३ ठराव क्र.२४२३ नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४० दि.२२/०३/२०१३

4) मा.महापालिका सभा ठ.क्र.२६३ दि.०९/०५/२०१३

मनपा परिसरातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी महापालिका क्षेत्रात एक विशेष पोलिस ठाणे प्रत्येक अ, ब, क ड प्रभागासाठी चार पोलिस चौक्या याकरिता पदे निर्मिती करणेकामी प्रस्तावात नमुद परिशिष्ट अ प्रमाणे ७८ पदे,परिशिष्ट ब प्रमाणे २८ पदे अशी एकूण १०६ पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण केली जाणार असून त्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती आगावू (Advance Payment) च्या स्वरूपात मनपाने करावयाची असून ही बाब विचारात घेता अ)प्रस्तावात नमुद शासन निर्णयात नमुद केलेल्या आणि मनपासाठी अनुज्ञेय असलेल्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन अंशदान होणा-या खर्चास व सदर खर्चाची रक्कम आगावू तिमाही हप्त्याच्या स्वरूपात राज्य शासनाकडे / संबंधीत पोलिस आयुक्तालयाकडे भरण्यास ब)सदर अधिकारी व कर्मचारी यांना पुरविण्यात येणा-या वाहन, कार्यालय

व इतर सुविधांवर येणा-या खर्चास व तो शासनाकडे/संबंधीत विभागाच्या पोलिस आयुक्तांकडे आगावू स्वरूपात भरण्यास क)सदर कक्षाच्या निर्मितीमुळे होणा-या खर्चाची पुर्तता करण्यासाठी मनपाच्या अंदाजपत्रकात नवीन लेखाशिर्ष निर्माण करून त्याखाली आवश्यक तरतूद प्रतिवर्षी करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

(टिप - माहे मे - २०१३ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्रमांक २)** संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजि/१/कावि/१३६/२०१३ दि.१०/०४/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १६/०४/२०१३ ठराव क्र.३२७७ नुसार

प्रस्तावासोबत जोडलेल्या पिंपरी चिंचवड मनपा भूमि जिंदगी विभागाच्या मिळकत वाटप नियमावली २०१३ यास मान्यता मिळणेकामी व त्यानुसार शासनास सादर करणेकामी सदरच्या विषयास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ३)** संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र लेखा/६/कावि/८६१/२०१३ दि.०९/०४/२०१३.

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २३/०४/२०१३ ठराव क्र.३२८९ नुसार

सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात जकात विभागाकडील महसुली भाग-१ जमा खर्च भाग-३ जमा-खर्च यात तरतुदींमध्ये एकुण रक्कम कमी/जास्त होत नाही. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात निश्चित केलेली रक्कम र.र. १२,००,३०,००,०००/- एवढीच राहते. तरी खालील प्रमाणे नवीन लेखाशिर्ष व तरतुदींमधील बदल करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे

**(अ) महसुली जमा**

| **अ.क्र.** | **लेखाशिर्ष** | **सन २०१३-१४ अंदाजपत्रकात तरतुद** | **कपात सुचविलेली रक्कम** | **सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात सुचविलेली रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | आयातकर (अनामत परतावा) १०% वसुली सह | ११,५७,९३,५५,०००/- | ११,०७,९३,५५,०००/- | ५०,००,००,०००/- |
| २ | इतर जमा | २,२०,०००/- | १,२०,०००/- | १,००,०००/- |
| ३ | एस्कॉर्ट | ४०,००,००,०००/- | १८,००,००,०००/- | २२,००,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | रहदारी पास | १,५०,००,०००/- | १,५०,००,०००/- | ० |
| ५ | लेखनिक खर्च वसुली | ७,१५,०००/- | ७,१५,०००/- | ० |
| ६ | इकरार पत्र | ६०,००,०००/- | ६०,००,०००/- | ० |
| ७ | शुल्कबंध वखार परवाना फी | २,२०,०००/- | २,२०,००० | ० |
| ८ | जी.सी. मुदतवाढ | ९,९०,०००/- | ९,९०,०००/- | ० |
| ९ | जकात अनामत जमा | ५,००,०००/- | ५,००,०००/- | ० |
| **(ब)** | **महसुली खर्च** | | | |
| | वाहन भाडयाने घेणे | ४०,००,०००/- | २,००,०००/- | ३८,००,०००/- |
| **(क)** | **भाग – ३ जमा** | | | |
| | जकात अनामत | ७०,००,००,०००/- | १०,००,०००/- | ६९,९०,००,०००/- |
| **(ड)** | **भाग – ३ खर्च** | | | |
| | अनामत परतावा | ७०,००,००,०००/- | १०,००,०००/- | ६९,९०,००,०००/- |

वरील प्रमाणे जकात लेखाशिर्षावरील रक्कमा कपात व रद्द करुन सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात स्थानिक संस्था कर म्हणुन खालील प्रमाणे रक्कमा व लेखाशिर्ष निर्माण करणे आवश्यक आहे.

**अ) <u>महसुली जमा</u>** :-

१) स्थानिक संस्था कर :- ११,२८,२८,००,०००/-

२) शुल्क (नोंदणी फी दुबार पत्र) :- १,००,०००/-

--------------------

**ब) <u>महसुली खर्च</u>** :-

१) स्थानिक संस्था कर परतावा :- २,००,०००/-

---------------------

**क) <u>महसुली जमा</u> :-**

१) स्थानिक संस्था कर प्रतिभुती रक्कम (सिक्युरिटी डिपॉझीट) :- १०,००,०००/-

--------------------

**ड) <u>महसुली खर्च</u> :-**

१) स्थानिक संस्था कर प्रतिभुती रक्कम परतावा (सिक्युरिटी डिपॉझीट :- १०,००,०००/-

---------------------

**मा.शहर सुधारणा समिती**

**विषय क्रमांक ४)** संदर्भ : १) मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८१ दिनांक ०६/०३/२०१३
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४७ दि.२२/३/२०१३
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.२७५ दि.०९/०५/२०१३

मंजूर विकास योजनेतील मौजे थेरगांव हद्यीतील सर्व्हे नं.३३ ते ३६ पै. मधून मोरया मंगल कार्यालयाकडे जाणा-या २४ मी. रुंद रस्त्यापासून थेरगांव स्मशानभूमी पर्यंत १२ मी. रुंद रस्ता व स्मशानभूमी ते थेरगांव गावठान २४ मी. रस्त्यापर्यंत सध्या अस्तित्वातील रस्ता ९ मी. रस्ता रुंद केल्यास नागरिकांची स्मशानभूमीकडे जाण्यासाठी त्या भागातील नागरिकांना रस्त्याची सोय होणार असल्याने सदरचा रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच मंजूर विकास योजनेतील मौजे थेरगांव हद्दीतील सर्व्हे नं.२५ व ३० मधून जाणारा १२ मीटर रस्ता सर्व्हे नं. २५ मध्ये अस्तित्वातील रस्त्याजवळ वाकडया वळणाचा असल्याने सदरचा रस्ता वाहतूकीच्यादृष्टीने सरळ करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.
(टिप-माहे मे - २०१३ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

-----

**मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे / कामे**

**शासनाकडून किंवा शासकीय अधिका-यांकडून आलेली पत्रे -**

**विषय क्रमांक ५)**संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/३०१/
२०१३ दि.६/२/२०१३.
२) मा.क्रीडा समिती सभा दिनांक २१/२/२०१३ ठराव क्र.४७.
३) मा.विधी समिती सभा दिनांक १/३/२०१३ रोजी ठराव क्र.१२४
४) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३०६९ दिनांक १२/३/२०१३
५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/६१५/१३
दि.१९/३/२०१३
६) मा.महापालिका सभा ठराव क्र.२८३ दि.०९/५/२०१३

प्रस्तावात सविस्तर क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-अ, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ब, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-क, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ड, मध्ये नमुद

केलेप्रमाणे मनपा क्रिडा धोरण मसुद्यास तसेच ३ डिसेंबर अपंग दिनानिमित्त अंध, अपंग, व मतिमंद विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करणेकामी परिशिष्ट अ/ब मध्ये नमूद तपशिलाचा मूळ धोरण मसुद्यात समावेश करुन परिपूर्ण क्रीडा धोरण मसुद्यास मान्यता देणेत येत आहे.

(टिप-माहे मे -२०१३ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

----------

## मा.महिला व बालकल्याण समिती

**विषय क्रमांक ६)** दिनांक २८/०३/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

## मा.क्रिडा समिती

**विषय क्रमांक ७)** दिनांक ०६/०३/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४४४/२०१३
दिनांक : ०९/०५/२०१३

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.